**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.जयप्रकाश व्ही.मोरे
डी, १०२, अनिषदर्शन फातिमानगर, पुणे ४११०१३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग कॅम्प, पुणे ४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक,
हडपसर पोलीस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६०४+१६०५+१६०६ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.जयप्रकाश व्ही.मोरे
डी, १०२, अनिषदर्शन फातिमानगर, पुणे ४११०१३

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस आयुक्त कार्यालय,
पुणे विभाग कॅम्प, पुणे ४११००१

**जन माहिती अधिकारी** तथा वरीष्ठ पोलीस निरीक्षक,
हडपसर पोलीस स्टेशन, पुणे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.७.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २३.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>हडपसर पोलीस स्टेशनमधील गुन्हा क्र.१०३/०४ च्या संदर्भातील दोषारोपपत्रासह या गुन्ह्यासंदर्भातील सर्व प्रकारची ६८ मुद्दयांवरील माहिती. | |

## विवेचन

हडपसर पोलीस स्टेशनमधील गुन्हा क्र.१०३/०४ च्या संदर्भात आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवर न मिळाल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री.जयप्रकाश व्ही. मोरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त फक्त जन माहिती अधिकारी उपस्थित होते. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-४, पुणे शहर श्री.जालिंदर सुपेकर यांनी अनुपस्थितीबाबत विनंतीपत्र दिले. प्रपत्रामध्ये जन माहिती अधिका-यांनी कोणतीही नोंद केली नाही. आपल्याला कोणतीही माहिती मिळाली नसल्याचे अपीलकर्ता श्री.मोरे यांनी प्रपत्रात नमूद केले, त्यामुळे अपील सुनावणीसाठी घेण्यात आले.

श्री.मोरे यांनी पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, प्रधान सचिव कार्यालय, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक कार्यालय, वानवडी पोलीस स्टेशन, हडपसर पोलीस स्टेशन, पोलीस उपायुक्त,परिमंडळ-२ पुणे यांच्याकडे माहितीसाठी अर्ज / अपिले केलेली आहेत. याकामी श्री.मोरे यांनी माहिती मागण्यासाठी केलेले सर्व अर्ज हे हडपसर पोलीस स्टेशनशी संबंधित असल्याने त्यांच्याकडे पाठविण्यात आले.

आपली कन्या व जावई यांना आर्थिक फसवणूक प्रकरणाशी संबंध नसताना चुकीची कलमे लावून पोलिसानी अटक केली. मुख्य गुन्हेगार आणि सूत्रधार यांना ताब्यात न घेता बेकायदेशीरपणे आपली कन्या व जावई यांना गुन्ह्यात गोवले, असे श्री.मोरे यांचे म्हणणे आहे. सर्व कागदपत्रांमध्ये त्यांनी ते विस्ताराने नमूद केले आहे. याबाबतची माहिती आपल्याला जाणीवपूर्वक दिली जात नाही, असे प्रतिपादन त्यांनी लेखी व तोंडी केले.

श्री.मोरे यांनी एकूण ६८ मुद्दयांची माहिती मागितली होती. सहाय्यक पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे यांनी त्याचे मुद्देनिहाय उत्तर जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, वानवडी विभाग, पुणे श्री.आर.व्ही.बिवल यांना सादर केले, त्यांनी ते श्री.मोरे यांना पाठविले. परंतु त्यात प्रत्यक्ष माहिती काही मुद्दयांबाबतच देण्यात आली व कागदपत्रांच्या प्रती ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट वर्ग-१, लष्कर कोर्ट, पुणे यांच्याकडे दि.२५.७.२००७ रोजी पाठविलेल्या दोषारोपपत्रासोबत जोडली असल्याचे श्री.बिवल यांनी त्यात नमूद केले व ही कागदपत्रे न्यायालयाकडून प्राप्त करुन घ्यावीत, असे कळविले. अर्जानुसार माहिती देण्यात आल्याचे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२ श्री.सतीश खंडारे यांनी श्री.मोरे यांचे अपील निकाली काढले.

श्री.मोरे यांनी अर्जात प्रत्येक मुद्दयावर विस्तृत भाष्य केले आहे. माहितीची नेमकी मागणी करणे आवश्यक होते, तसे त्यांनी केलेले नाही. त्यांनी तसेच .. 'पूर्वनियोजित कृत्य पूर्णपणे तपासून मला कळविण्यात यावे,' 'पीएसआय सुनील जाधव यांच्यासह आणखी कोण-कोण व्यक्ती पोलीस कस्टडीत असताना कोणत्या तारखेला व वेळेस आरोपींना भेटले? त्या रजिस्टरमधील नोंदीच्या पानाची छायाप्रत पाठवावी, म्हणजे त्यांचेविरुध्द योग्य तो गुन्हा योग्य त्या स्तरावर नोंदवता येईल,' 'सदर प्रकरणी महिला लॉकअपमधील व्यक्तीस किती वाजेपर्यंत भेटता येते? आणि रात्रीच्या वेळेस किती वाजेपर्यंत भेटता येते? याचा संबंधित नियमासह खुलासा व्हावा व या नियमांची प्रत त्यासह पाठवावी,' 'वकिलासह श्री.सुनिल जाधव, पीएसआय यांनी आरोपी क्र.२ यांचीही एका बॉडपेपरवर स्वाक्षरी घेण्याचा प्रयत्न केला. हे कृत्य कोणत्या पोलीस संहितेत बसते त्या नियमाची प्रत

पुरविण्यात यावी.' 'वृत्तपत्रामध्ये या प्रकरणी प्रसिध्द झालेल्या बातम्यांची कात्रणे, बातम्या देणारे वार्ताहर, संपादक, मुद्रक, प्रसिध्दी माध्यम यांची नावे व पत्ते, प्रसारमाध्यमांच्या क्लीप्स आपल्याला पाठवाव्यात' अशा स्वरुपाच्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील 'माहिती'च्या व्याख्येत न बसणाऱ्या मागण्याही आहेत. हे सुनावणीतील मुद्देनिहाय तपासणीतून स्पष्ट झाले. काही मुद्दयांची त्यावेळच्या वस्तुस्थितीनुसार माहिती देण्यात आली आहे, तपासातील प्रगतीनुसार काही माहिती नंतर दिली आहे, असे श्री.बिवल यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी श्री.बिवल यांनी दिलेले उत्तर दि.२३.९.२००७ चे असून त्यानंतर काही आरोपींना अटक करण्यात आली किंवा तपासात आणखी प्रगती झाली, हे श्री.बिवल यांनी स्पष्ट केले. मुद्दा क्र.२४ ते २९, ३१ ते ३३, ३५ ते ४०, ५३ ते ५६, ५८ ते ६२, ६४ ते ६७ ची माहिती दोषारोपपत्रासोबतच्या कागदपत्रामध्ये उपलब्ध होईल असे जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले.

न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दोषारोप पत्राची प्रत अपीलकर्त्याने न्यायालयातून मिळवावी, असे उत्तर पोलिसांकडून दिले जाणे योग्य नाही. जन माहिती अधिकारी अशी प्रत मिळवून अपीलकर्त्यास पुरवू शकतात. तसेच संबंधित गुन्ह्याबाबतच्या तपासाची पूर्ण माहिती अपीलकर्त्यास दिली जाणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) न्यायालयात दाखल केलेल्या दोषारोपपत्र व त्यासोबतची सर्व कागदपत्रे यांच्या प्रती जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे यांनी एक आठवड्यात अपीलकर्ता श्री.जयप्रकाश व्ही. मोरे यांना पुरवाव्यात. सर्व कागदपत्रांच्या अधिकृततेबाबतचा स्पष्ट उल्लेख त्यासोबतच्या पत्रामध्ये करावा.

(३) मुद्दा क्र.१७, २०, २२, ३४,४१, ४२, ४९, ५३ ते ५५ ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन घेऊन एक आठवड्यात श्री.मोरे यांना पुरवावी. त्याबाबतच्या अधिकृततेचा स्पष्ट उल्लेख त्यासोबतच्या पत्रात करावा.

(४) सुनावणीच्या दिनांकापासून एक आठवड्यात वरील कार्यवाही करावयाची असल्याचा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच तोंडी दिलेला आहे. त्यानुसार केलेल्य कार्यवाहीचा अहाल जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ पोलीस निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन, पुणे श्री.व्ही.एन.सोनवणे व अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे श्री.जालिंदर सुपेकर यांनी दि.४.४.२००९ पर्यंत आयोगाला सादर करावा.

(५) वरील क्र.३ व ४ मध्ये प्रत्येक प्रत साक्षांकित करुन देण्याची आवश्यकता नाही. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस उपायुक्त, परिमंडळ-२, पुणे श्री.जालिंदर सुपेकर उपस्थित नव्हते, तसेच आयोगाची पूर्वपरवानगी घेणारे कोणतेही निवेदन त्यांनी सादर केले नव्हते, ही बाब आक्षेपार्ह असून त्याबाबतचा खुलासा त्यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून एक आठवड्यात आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.आदित्य पेंढारकर
सी/१०, निकाश स्काईस, सोमेश्वरवाडी, पाषाण, पुणे-४११००८ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
बांधकाम नियंत्रण व विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६२२ / पुणे /२००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.८.२००८ |

३. उपस्थित

**अपिलीय प्राधिकारी** तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ तथा उपायुक्त क्र.१, पुणे
श्री.सुरेश जगताप

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण व विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ प्रतिनिधी श्री.श्याम ढवळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ६.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.१०.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३१.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.११.२००७ |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | इंदिरा वसाहत वॉर्ड नं.३२ मधील नाल्याचा नकाशा, सिंध सोसायटीलगत असलेल्या भिंतीच्या बांधकामाचा प्रस्ताव व तो प्रस्ताव मंजूर केलेल्या अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा. भिंत बांधण्यासाठी नाला बंद करण्यासाठी असणाऱ्या नियमावली, नाल्याची दिशा वळविण्यासाठी असलेल्या नियमावलीची प्रत. |

## विवेचन

पुण्यातील औंध विभागातील सिंध सोसायटी व इंदिरा वसाहत झोपडपट्टी यांच्यामधील नाल्याच्या भिंतीच्या बांधकामाबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.आदित्य पेंढारकर यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, बांधकाम व विकास नियंत्रण योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे मागितली होती. 'नाल्याचा नकाशा जलोत्सारण विभागाकडून उपलब्ध करुन घेण्यात येत आहे. तसेच सिंध सोसायटीच्या सीमाभिंतीच्या बांधकाम परवानगीचे नकाशे शोधण्यात येत असून सिंध सोसायटीकडे देखील सीमाभिंतीचे बांधकाम परवानगी नकाशाबाबत विचारणा केलेली आहे. त्यानुसार माहिती उपलब्ध होताच आपणास त्वरित कळविण्यात येईल,' असे उत्तर जन माहिती अधिकारी यांनी दिले. सद्यस्थितीची जागा पाहणी त्वरित करुन उपलब्ध असलेली माहिती त्वरित देण्यात यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दिला. माहिती कधी द्यावी, जन माहिती अधिकारी नेमके कोण, माहिती का दिली गेली नाही, या कोणत्याही बाबी स्पष्ट न होता अपिलीय प्राधिकाऱ्यांनी हा आदेश दिला आणि आपल्याला त्यानंतरही कोणतीही माहिती मिळाली नाही, असे नमूद करुन श्री.पेंढारकर यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सिंध सोसायटी व इंदिरानगर वसाहत यांच्यामध्ये असलेला नाला पाईप टाकून बंद करुन अनधिकृतपणे भिंत बांधलेली आहे. त्यामुळे इंदिरा वसाहतीतील ४०० ते ५०० घरामध्ये पावसाळ्यात २ ते ३ फुटांपर्यंत पाणी चढते. रात्रीच्या वेळेस अचानक घरात पाणी शिरल्यास मोठी

जिवितहानी होऊ शकते. असे असतानाही मूळ अर्जाला सात महिने उलटूनही बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका यांनी कोणतीही माहिती दिलेली नाही व कार्यवाहीही केलेली नाही, असे श्री.पेंढारकर यांनी निवेदनात नमूद केले आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी हे विलंबाबाबत कोणतेही स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत.

श्री.पेंढारकर यांचा अर्ज दि.७.९.२००७ चा असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता(वि.यो.), पुणे महानगरपालिका श्री.अनिरुध्द पावसकर यांनी दि.६.१०.२००७ रोजी उत्तर दिले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये उत्तर देण्यास तीस दिवसांची मुदत असून तिसाव्या दिवशी सदर उत्तर दिले आहे. जलोत्सारण विभागाला नेमके कधी कळविले, बांधकाम परवानगीचे नकाशे शोधले तेव्हा सिंध सोसायटीकडे त्याबाबतची माहिती मागितली ती कधी, हे उत्तरात स्पष्ट नाही, तसेच त्याबाबत पुरावे दर्शविणारी कोणतीही कागदपत्रे जन माहिती अधिकाऱ्यांनी सादर केलेली नाहीत. प्रथम अपिलाची सुनावणी दि.१६.११.२००७ रोजी झाली, नानावाडा येथे सर्व अभिलेख पाठविलेले असल्याने सदरचे अभिलेख पाहून त्वरित माहिती देण्यात येईल, असे नगर उपअभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग श्री.श्याम ढवळे यांनी सुनावणीत सांगितल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निकालपत्रात नमूद केले आहे. मूळ अर्जापासून जवळजवळ ७० दिवस अभिलेख पाहिले नाहीत व अर्जावर कोणतीही कार्यवाही झालेली नाही, याचा अर्थ असा होतो. त्यानंतरही कोणतीही माहिती दिली गेली नाही, अशी तक्रार श्री.पेंढारकर यांनी केल्यानंतर आयोगाने दि.८.४.२००८ रोजी या विषयाचा अहवाल सादर करण्याचे व त्वरित माहिती अपीलकर्त्यास देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता यांनी दिले. त्यावरही नगर उपअभियंता यांनी कोणतीही कारवाई केली नाही. या सर्व बाबी पाहता माहिती देण्याबाबत व पर्यायाने नागरी प्रश्नांबाबत असलेली या अधिकाऱ्यांची अनास्था स्पष्ट होते.

आपण उपायुक्त क्र.१ पदाची सूत्रे स्वीकारुन एक महिनाच झाला आहे. आपण ही माहिती त्वरित देऊ, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका, पुणे तथा उपायुक्त क्र.१, पुणे श्री.सुरेश जगताप यांनी केले.

मूळ उत्तराला झालेला विलंब व विकास अभियंता यांनी आयोगाला अहवाल सादर न करण्याच्या संदर्भातील खुलासा आठ दिवसात सादर करावा. तसेच अपीलकर्त्यास पूर्ण माहिती नि:शुल्क द्यावी, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार, 'सिंध सोसायटीचा प्लॉटेड लेआऊट जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेला आहे. इंदिरा वसाहत ते सिंध सोसायटी दरम्यान प्लॉट नं.१३५ शेजारुन गेलेला नाला पूर्वीपासून बंदिस्त असून, सदर बंदिस्त नाल्यामधील कमी व्यासाची पाईपलाईन काढून १००० मि.मि.व्यासाची नवीन पाईपलाईन टाकणेचे काम औंध क्षेत्रिय कार्यालयामार्फत करण्यात आले आहे. त्यामुळे इंदिरा वसाहतमध्ये व सिंध सोसायटीमध्ये नाल्याचे पाणी शिरण्याचे प्रमाण कमी झाले आहे. सदर बंदिस्त नाल्याशेजारी सिंध सोसायटीमधील प्लॉट नं.१३५ मध्ये नाला सोडून इमारतीसाठी बांधकाम परवानगी देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेल्या प्लॉटेड लेआऊटनुसार इंदिरा वसाहत व सिंध सोसायटी दरम्यान प्लॉट हद्दीवर सुरक्षिततेच्या दृष्टीने सीमाभिंत बांधण्यात आलेली आहे. नाला बंदिस्त असल्यामुळे सीमाभिंतीच्या बांधकामामुळे नाल्यातील पाण्याच्या प्रवाहाला कोणताही अडथळा होत नाही,' असा खुलासा अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका तथा उपायुक्त क्र.१,पुणे श्री.सुरेश जगताप यांनी सादर केलेल्या दि.२२.८.२००८ च्या निवेदनानुसार (प्राप्त २७.८.२००८) केला आहे. श्री.पेंढारकर यांना दिलेल्या माहितीची दि.२०.८.२००८ ची प्रत सोबत त्यांनी जोडली आहे.

अहवाल वेळेत सादर करणे अनवधानाने राहून गेले आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका तथा उपायुक्त क्र.१, पुणे श्री.सुरेश जगताप यांनी या निवेदनात म्हटले आहे. त्यातून गांभीर्याचा अभव स्पष्ट होतो. त्याबाबत श्री.सुरेश जगताप यांना समज देण्यात येत आहे.

अर्जदार यांना माहिती न देण्याचा खात्याचा दुसरा कोणताही हेतू नव्हता असे श्री.सुरेश जगताप, विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण विभाग, पुणे महानगरपालिका तथा उपायुक्त क्र.१, पुणे यांनी म्हटले आहे, मात्र माहिती देण्याबाबत कोणतेही गांभीर्य व तत्परता तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेली नाही. मूळ अर्जानंतर अकरा महिन्यांनी अपीलकर्त्यास माहिती देण्यात आली आहे. हा विलंब क्षम्य मानता येणार नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी निर्णय दिल्यानंतर त्याची अंमलबजावणी होण्याचीही जबाबदारी पार पाडलेली नाही, त्यामुळे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) प्रथम अपिलाच्या सुनावणीत अभिलेख तपासून त्वरित माहिती देण्याचे कबूल करणारे नगर उपअभियंता श्री.श्याम ढवळे, तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.शांताराम थोरात व विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.जगदीश खानोरे या तिघांना मिळून रुपये २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. आयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी त्यांच्याकडून ही शास्ती समप्रमाणात वसूल करुन ती एप्रिल २००९ च्या मे २००९ मध्ये देय असलेल्या वेतनातून कपात करुन दि.१५.५.२००९ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी. तसेच याची नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात घेऊन आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी तसा पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीपाद माधव नेने
१२६५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे ५८२डी, गुलटेकडी मार्केटयार्ड, पुणे-३७ उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,
पुणे उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर,
पुणे ५८२डी, गुलटेकडी मार्केटयार्ड, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६४९ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१२.३.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीपाद माधव नेने
१२६५, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपनिबंधक, सहकारी संस्था,
पुणे शहर, पुणे ५८२डी, गुलटेकडी मार्केटयार्ड, पुणे-३७

**जन माहिती अधिकारी** तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१,
पुणे उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर,
पुणे ५८२डी, गुलटेकडी मार्केटयार्ड, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३.९.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.९.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.१२.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>जुलै २००९ मध्ये मान्यता मिळालेल्या बायलॉजमध्ये निर्देशित बायलॉज नं.१७५-ए मध्ये उल्लेखिलेल्या सर्व बाबीसंबंधित (ए ते यू) जुलै २००९ ते आजपर्यंतच्या कालावधीत उपनिबंधक कार्यालयाकडे सहकारी संस्थांच्या सभासदांकडून किती तक्रारी प्राप्त झाल्या त्याची विगतवारी, या तक्रारींपैकी किती तक्रारींची उपनिबंधक कार्यालयाकडून समाधानकारक सोडवणूक केली त्याची माहिती. शुभआशिर्वाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित या सोसायटीने बायलॉज २००१ स्वीकारलेले आहेत. सदर सोसायटीत या बायलॉजप्रमाणे संस्थेचा खर्च, ऑडिट व इतर बाबी केल्या जात नाहीत. या सोसायटीसंबंधी केलेल्या तक्रारींची व बायलॉजसंबंधीची सन २००१ ते २००५ या काळातील परिपूर्ण माहिती. | |

## विवेचन

सहकारी गृहरचना संस्थेबाबत उपनिबंधक कार्यालयाकडे आलेल्या तक्रारींची विगतवारी व शुभआशिर्वाद गृहरचना सहकारी संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे या संस्थेच्या कारभाराबाबत श्री.माधव गणेश नेने यांनी केलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीबाबतची माहिती आपण मागितली होती. परंतु सहकारी संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचे कारण देऊन जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१, पुणे उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी ती नाकारली व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही, अशा कारणावरुन अपीलकर्ता श्री.श्रीपाद माधव नेने यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

राज्य माहिती आयोगाने दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या ‘विशेष अपील निर्गत कार्यक्रमा’त या अपिलाचा समावेश करण्यात आला होता. यावेळी अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही, असे नमूद केल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री.नेने यांनी विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे. तसेच उपनियम १७५ अन्वये उपनिबंधक कार्यालयाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींची विगतवारी व त्यावरील कार्यवाही अशी माहिती मागितली आहे. अशा स्वरुपाची नोंद ठेवली जात नसल्यामुळे ती देणे शक्य नाही, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी श्री.वि.वि.कोकरे यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. मात्र शुभआशिर्वाद गृहरचना सहकारी संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे संदर्भात श्री.माधव गणेश नेने यांनी केलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती त्यांना हवी असल्यास देता येईल, असेही त्यांनी नमूद केले. आपल्याला ही माहिती हवी असल्याचे श्री.नेने यांनी सांगितले.

श्री.नेने यांनी मागितलेली माहिती विस्तृत व ढोबळ स्वरुपाची आहे. त्यांनी माहिती नेमकेपणाने मागणे आवश्यक आहे. उपनिबंधकांचे अधिकार, कार्यालयीन कामकाजाविषयीचे नियम ही माहिती कोणत्याही नागरिकाला संबंधित नियमामध्ये मिळू शकते, तसेच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ४ अन्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणांनी नागरिकांसाठी ही माहिती स्वयंस्फूर्तीने जाहीर करणे बंधनकारक आहे, याची नोंद जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी घ्यावी. कार्यालयात कार्यवाही णाली आहे का, हे त्यांनी स्पष्ट करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) श्री.माधव गणेश नेने यांनी शुभआशिर्वाद गृहरचना सहकारी संस्था मर्यादित, सदाशिव पेठ, पुणे या संस्थेच्या संदर्भात केलेल्या तक्रारींवरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहकारी अधिकारी श्रेणी-१, पुणे उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे

शहर श्री.वि.वि.कोकरे यांनी अपीलकर्ता श्री.श्रीपाद माधव नेने यांना आठ दिवसात द्यावी व पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा.

(३) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्य कलम-४ च्या आपल्या कार्यालयातील कार्यवाहीबबतचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी श्री. श्री.वि.वि.कोकरे यांनी आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.४.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ.क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची ~~मागणी~~ (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १६७१ | श्री.सुधाकर दिनकर किर्वे सर्व्हे नं.५/१०, ऋतुनगरी, धायरी, बेनकर वस्ती मार्ग, पुणे-४१ | उप निबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ | जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, पुणे विभाग, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ | निवडुंग सहकारी गृहनिर्माण संस्था (म.) धायरी, ता.हवेली, जि.पुणे या संस्थेच्या गैरकामकाजाबाबत, आर्थिक व्यवहार हिशोब पडताळणी, बांधकाम विकसक श्री.पंकज घरत व बांधकाम कंपनीचे ना, रजिस्ट्रेशन, बांधकाम विकसित टेंडर, बांधकाम मंजुरी नकाशे, सोसायटी अंतर्गत कामकाजाची माहिती व अनुषंगिक मुद्दे |
| २ | १७११ | श्री.शेखर द.साळी वृंदावन हौ.कॉ.सेक्टर डी, फ्लॅट बी-१३, पौडरोड, कोथरुड, पुणे-३८ | जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२, सहकारी संस्था, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७ | अप्पर विशेष लेखापरीक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-३७ | वृंदावन हौसिंग कॉम्पलेक्स सेक्टर-डी , विंग ए ते डी सहकारी संस्था, पौड रोड, कोथरुड, पुणे-३८ या संस्थेचा लेखापरीक्षण अहवाल (दि.३१.०३.२००५ अखेरचा) प्रमाणित लेखापरीक्षक श्री.अमोल जोशी यांनी सादर केलेला आहे. त्यामधील निष्कर्षांबाबत शंका निरसन व विसंगतीबाबत माहिती. |
| ३ | १७२१ | श्री.विठ्ठल बाबू ४ , सुबह सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., ५३/४, मासुळकर कॉलनी, पिंपरी, पुणे १८ | सहाय्यक निबंधक (गृह) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | सहकार आयुक्त व निबंधक (गृह) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | सुबह सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., मासुळकर कॉलनी, पिंपरी, पुणे१८ या संस्थेच्या कामकाजाबाबत सहकार विभागाकडून करावयाच्या कार्यवाहीची माहिती. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | १८३२ | श्री.मोहन सगाजी पाटोळे मु.पो.करंजे, ता.बारामती, जि.पुणे | कार्यकारी संचालक, श्री.सोमेश्वर सहकार साखर कारखाना लि. सोमश्वरनगर, ता.बारामती, पुणे- ४१२ ३०६ | प्रादेशिक सहसंचालक (साखर संकुल), शिवाजीनगर, पुणे-५ | श्री.सोमश्वर सहकारी साखर कारखाना मर्या., सोमेश्वरनगर, ता.बारामती, जि.पुणे या कारखान्यातील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्यात आलेला आहे किंवा कसे ? व अनुषंगिक मुद्दे |
| ५ | १९१७ | श्री.नामदेव शामराव नालंदे सा.कराभिमा टाईल्स, व्हील कॉलनी, बारामती.जि.पुणे | माहिती अधिकारी तथा मॅनेजर बारामती तालुका सहकारी खरेदी विक्री संघ लि. बारामती, जि.पुणे | जिल्हा निबंधक सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे -५ | बारामती तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या., बारामती या संस्थेतील महिला कर्मचारी श्रीमती जमदाडे यांचे निलंबन व सेवा विषयीची माहिती. |
| ६ | १९८४ | श्री.झेड.एच. एफ.मौलाई ३०९, क्लोव्हर व्हिलेज कार्लाईस कोर्ट, को.ऑ.हौ.सो., ६६/६७, वानवडी, पुणे-४० | उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | क्लोव्हर व्हिलेज कार्लाईस कोर्ट,को-ऑप हौसिंग सोसायटी, वानवडी, पुणे ४० या संस्थेच्या कामकाजाविरुध्द सहकार विभागाकडून करण्यात आलेल्या कारवाईची माहिती. |
| ७ | २००७ | श्री.वासुदेव वामन कुंभोजकर प्लॉट क्र.१, देवधर सहकारी गृहरचना संस्था मर्या चिंचवड, पुणे ३३ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (३), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे - ५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | देवधर सहकारी गृहरचना संस्था मर्या., चिंचवड, पुणे ३३ या संस्थेवरील प्रशासकीय कारकीर्दीबाबतची माहिती |
| ८ | २०८२ | श्री.मोहन श्रीपाद घाटपांडे मु.पो.वेल्हे, ता.जुन्नर, जि.पुणे | कार्यकारी संचालक, श्री.विघ्नहर रुई साखर कारखाना लि.जुन्नर आंबेगाव, जि.पुणे | आयुक्त, साखर आयुक्त यांचे कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ | श्री.विघ्नहर सहकारी साखर कारखाना मर्या.,जुन्नर आंबेगाव, जि.पुणे यांचेकडून ऊस तोडबाबतचे आदेश, ७/१२, ऊस नोंद इ. कागदपत्रांची मागणी. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ९ | २२७३ -अ/ पुणे | श्री.बा.द.दसरे अध्यक्ष, वैदेही सहकारी गृहरचना संस्था मर्या.,४५, गिरीजा सोसायटी, एम. आय. डी.सी. जवळ, कोथरुड,पुणे३८ | उपनिबंधक, सहकारी संस्था पुणे शहर (१), पुणे | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था माढा, जि.पुणे | वैदेही सहकारी गृहरचना संस्था मर्या., ४५, गिरीजा सोसायटी, एम.आय.टी.जवळ, कोथरुड, पुणे-३८ ही संस्था विसर्जित करणेबाबत व दप्तराचा ताबा मिळणेबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती |
| १० | २६०१/ पुणे | श्री.रामचंद्र कृष्णाजी बोडरे मु.पो.सोनगाव, ता.बारामती, जि.पुणे | सचिव, श्री सोनेश्वर सहकारी सामुदायिक शेतकी संघ जि.सोनगाव, ता.बारामती, जि.पुणे | सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, ता.बारामती, जि.पुणे | श्री सोमेश्वर सहकारी सामुदायिक शेतकी संघ मर्या., सोनगाव, ता.बारामती, जि.पुणे या संस्थेच्या अनामत रक्कमा, कर्जे, मंजुरी यादी, सचिव नेमणूक इ.माहिती. |

## विवेचन

ज्या सहकारी गृहनिर्माण व अन्य संस्थांना शासकीय जमीन, अनुदान वा अन्य स्वरुपात भरीव मदत मिळत नाही त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होणार नाही. मात्र नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार या बाबतीत संबंधीत कार्यालयांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील अपिले तक्त्यातील अनुक्रमांक १ ते १० (क्रमांक १६७१, १७११, १७२१, १८३२, १९१७, १९८४, २००७, २०८२, २२७३ व २६०१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६-०४-२००९